।। श्री गणेशाय नम: ।।

# ।। मनोगत ।।

सर्व विश्वाचे पालन पोषण करणारे माझे श्री राम भगवान, व माझे हृदयस्थ राम भक्त हनुमान माझे प्राणच होय. यांना कोटी कोटी दंडवत करुन मी आई–वडिलांच्या आशीर्वादाने दोन शब्द लिहित आहे. मी जे हे अभंग लिहिले आहे, ते माझ्या हनुमंताच्या कृपेने व त्यांच्या आज्ञेप्रमाणे काव्य केले आहे. हे मला कसे सुचले ? ते माझ्या कडून कसे झाले ? ते मलाच कळत नाही. ही सर्व श्री रामाची लीलाच म्हणावी लागेल. राम सेवक हनुमंताचे आशीर्वाद कृपेचे अमृतच होय. ते अमृत जीभेवर आल्याशिवाय हे काव्य होणे शक्य नाही. मला हे दृष्टांत दिसले की मी राम नामाचे अमृत सेवन करत आहे.

मला कोणी तरी हे अमृत पाजत आहे, माझ्यासमोर कोणी तरी एक धर्मात्मा भगवे वस्त्र धारण केलेला मला डोळ्यासमोर दिसत आहे. त्याच्याकडे मी डोळे उघडून पाहात आहे. तर मला राम भक्त हनुमान आल्याचे जाणवले व माझी श्रध्दा आणि राम नामाची भक्ती एक निष्ठा मला सांगत होती. की ''हेच तुझे रामभक्त हनुमान, हेच तुझे जीवन, हाच तुझ्या जीवनाचा अर्थ जास्त काही सांगत नाही.''

जे काही सत्य घडून आले व मला उपदेश करुन अदृष्य झाले. तेच मी सांगत आहे. मग काही क्षणात मला वाटायला लागले की, आपण श्रीराम प्रभूवर काव्य, अभंग करावे. मनाचा पक्का निश्चय करुन मी एकान्त जागी जाऊन बसलो. मला ती बुद्धी आपोआप सूचत गेली. मी कसे लिहीत होतो ते मलाच कळत नव्हते, मला मराठी, संस्कृत बरोबर वाचता येत नाही. माझे वाचन लिखाण बरोबर

मी माझ्या बुद्धीने लिहून हनुमंत प्रभूच्या चरणी अर्पण करुन श्रीराम भगवानांना विनंती करुन माझे विश्वासाचे ईश्वरनिष्ठ, संतनिष्ठ तसेच संत, ग्रंथ, अभ्यासक, चिंतक सर्वांचे आदरणीय ह.भ.प प्रभाकर महाराज खैरनार (पाळेकर) यांच्याकडे देत असे. ते मला सांगत असत की, 'गुरुमाऊली हे सत्य काव्य आहे. हे खरंच अभंग आहे. श्री रामावर हे काव्य तुमच्याकडून श्रीराम व हनुमंतच करुन घेत आहे, हे सत्य आहे. तुम्ही हे काव्य असेच करा हे कार्य चांगले आहे.' त्यांनी बरेच सहकार्य केले. अक्षर बरोबर आहे की नाही ? काना, मात्रा, वेलांटी, ऊकार, यमक बरोबर आहे की नाही हे सर्व सहकार्य करत गेले. माझे हे काव्य साक्षात हनुमान प्रभुनेच करुन घेतले. कारण मला मराठी पण बरोबर लिहीता येत नाही. माझी ''राम नामाची साधना'' च हे कार्य करीत होती.

माझा सर्वांत लाडका शिष्य चि.सचिन विठ्ठल कापसे (सिद्धीनाथ) याने मला लिखाणाचे सहकार्य केले. मी अभंग सांगत होतो व तो लिहून घेत असे. दुसरा शिष्य माझा चि. समीर अशोक पेरकर (सुदर्शन) ह्याने पण अभंग चांगल्या अक्षरांत लिहिले व ते सर्वांना आवडले. सर्व शिष्य मंडळी आनंदून गेली.

गुरुदेवांचे हे काव्य म्हणजे आम्हाला अनंत जन्माचे अमृत भोजनच दिले आहे. राम नाम आम्हा सर्व ब्रम्हचारी आश्रमाचे अतिशय प्रिय असे अमृत आहे, म्हणून हे काव्य आम्हा सर्वांना नवजीवन मिळाले आहे. तसेच वाचकांना ही नवजीवन मिळो.''राम नाम माझी साधना'' हा ग्रंथ मी लिहीला आहे. तो श्रीरामचरणी समर्पित करत आहे. काही कळत न कळत माझ्यात त्रुटी असतील तर, माझ्या रामभक्त वाचकांनी सूचना करावी किंवा सुचवावे. आम्ही जरुर त्याचा स्विकार करु. मला वेद ज्ञान, शास्त्र ज्ञान व पुराण ज्ञान नसल्याने चूका कदाचीत झाल्या असतील तर त्याबद्दल सर्व राम भक्तांची क्षमा मागतो.

श्री राम श्री राम श्री राम श्री राम श्री राम

मी हा ग्रंथ ''राम नाम माझी साधना'' हे सर्वांना राम नामाचे चिंतन घडो, राम नामाचा प्रसार होवो व सर्वांना चांगला मार्ग मिळो.

आज आपल्याला समाजामध्ये अनंत दु:खे, धर्मांवर संकट, देवांना न मानने, साधू व संतांवर अन्याय घडत आहे, आई–वडिलांची सेवा न करणे, तुच्छ बुद्धी असे बरेच उदाहरण आहेत. कोणी देवांना मानायला तयार नाही. लोकांचा विश्वास कमी होत चालला आहे. म्हणून मी श्रीराम कृपेने हा ग्रंथ लिहिला आहे सर्व भाविकांनी हा ग्रंथ संग्रहीत ठेवावा व अवश्य वाचावा व आपल्या जीवनाचे सार्थक करुन घ्यावे,

ही नम्र विनंती.

। करविली तैसी केली कटकट । वाकडे की निट देव जाणे ।।१।।

। कोणा कारणे झाले हे निर्माण । देवाचे कारण देव जाणे ।।२।।

। तरी न्यूनते पुरते अधिक ते सरते । करुन घ्यावे तुमते । विनवित असे (ज्ञाने.)

गुरुवर्य प. पु. बालब्रम्हचारी साहेबान महाराज

(गुरुमाऊली)

ब्रम्हचारी आश्रम

श्री राम श्री राम श्री राम श्री राम श्री राम